# ऑल राउंडर बच्चु कडू यंदाही मॅच काढणार?



## प्रहार च्या 'बॅट' चा निवडणूकीच्या मैदानावर तांडव

### सभेला उसळला अफाट जनसागर

### रेकॉर्ड ब्रेक बाईक रॅलीने विरोधकांना दातखिळी

*महासागर प्रतिनिधी*

*अचलपूर,( दि.18 )- सत्तेत राहून सत्ताधाऱ्यांना शेतकरी, शेतमजूर, कामगारांच्या मुद्दयावर घरचा आहेर देणारे ऑल राउंडर बच्चु कडू पुन्हा एकदा निवडणुकीची मॅच काढण्याच्या तयारीत दिसत आहेत. त्यांच्या 'बॅट' या बोधचिन्हाने निवडणूकीच्या रिंगणात अक्षरशः प्रचाराचा तांडव घातला असून प्रचाराच्या अखेरच्या दिवशी सोमवारी ( दि.18 ) त्यांची रेकॉर्ड ब्रेक बाईक रॅली पाहून विरोधकांना दातखिळी बसली. येथील गांधी पूल परिसरात झालेल्या सभेला डोळे विस्फरावे इतका अफाट जनसागर उसळला होता.*



राज्यातील लढवय्ये नेते म्हणून प्रसिद्ध असलेले शेतकरी ,शेतमजूर, कामगार आदी शोषित घटकांचे नेतृत्व करणारे बच्चू कडू यांचे समर्थन करण्यासाठी आज मतदारसंघात पांढऱ्या वादळाच्या रूपात मोठा जनसमुदाय रस्त्यावर उतरला. या पांढऱ्या वादळाने बच्चू कडूंच्या विजयाची हमी दिल्याचे चित्र सोमवारी दिसून आले.निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी अचलपूर मतदारसंघातील परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीचे उमेदवार प्रहारचे संस्थापक बच्चू कडू यांच्या समर्थनार्थ रेकॉर्ड ब्रेक बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीने आज पर्यंतचे सर्व विक्रम मोडीत काढले असून या शक्तिप्रदर्शनाने विरोधकांचे धाबे दणाणून सर्वत्र बॅटचा बोलबाला दिसून आला. बच्चू कडूंची बॅट निवडणुकीच्या मैदानात मोठे फटके मारून मैदान जिंकणारच असा दावा कडू समर्थकांनी केला आहे.



बच्चू कडू यांच्या बाईक रॅली ला चांदुर बाजार बेलोरा स्टॉप वरील मुख्य प्रचार कार्यालयापासून प्रारंभ झाला. सकाळी 9 वाजता ही रॅली जयस्तंभ चौक मार्गे, माधान, ब्राम्हणवाडा थडी,चिंचोली, मार्कंडा, शिरजगाव कसबा, आलमपूर, करजगाव, खरपी, परतवाडा मेन रोड, बैतुल स्टॉप,पोलीस स्टेशन सदर बाजार, जयस्तंभ चौक परतवाडा, डेपो, विदर्भ मिल, तहसील गेट, टक्कर चौक,सराफा या मार्गाने मार्गक्रमण करीत गांधीपूल अचलपूर येथे पोहचली. बच्चू कडू यांच्या यांच्या रॅलीदरम्यान गावागावात महिलांनी मार्गाची स्वच्छता करून रांगोळीने परिसर सुशोभित केला होता. बच्चू कडू यांच्यावर फुलांचा वर्षाव करून महिला वर्गाने प्रचंड उत्साहात स्वागत करत त्यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रहारच्या बाईक रॅलीमध्ये तुफान गर्दी होती. जवळ जवळ तीस हजार तरुणांचा या रॅलीत स्वयंस्फूर्त सहभाग होता. शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षाची रॅली निघाली. आज पाचव्यांदा बच्चू कडू हे विजयाच्या उंबरठ्यावर असल्याचे चित्र या दुचाकी रॅलीने स्पष्ट केले. चांदुर बाजार ते परतवाडा होत सकाळी 9 वाजता निघालेली ही रॅली तब्बल सहा तासानंतर अचलपूर येथे पोहचली. सर्वत्र रंग दे बसंती चोला या गीताने वातावरण देशभक्तीमय झाले होते. एकीकडे बच्चू कडू जीप वर स्वार होऊन सर्वांना अभिवादन करत होते आणि दुसरीकडे जनता जयघोष करीत होती.

## विषारी सापांचे दात छाटण्याचे काम या गारुडीने केले-नयना कडू

तुम्ही आमदार बच्चू कडू यांना गारुडी म्हणून बोलता जर आम्ही गारुडी आहोत, तर आमच्यासारखे गारुडी होऊन दाखवा. आमदार कडू हे 12 महिने 365 दिवस जनतेच्या सेवेत असतात. तुम्हाला वीस वर्षात अजून दुसरा शब्द सुचला नाही. या गारुडीने संपूर्ण विषारी सापांचे दाट छाटण्याचे काम केले आहे हे विसरता कामा नये. कोणी 'ऐयरा गयरा नत्थू खैरा' आमदार कडू यांच्यावर टीका करेल हे मतदार संघातील जनता खपून घेणार नाही, येणाऱ्या 20 तारखेला जनता विरोधकांना उत्तर दिल्याशिवाय राहणार नाही. हिंदू धर्माची खरी व्याख्या जर ओळखायची असेल तर राजे शिवछत्रपती महाराजांचा इतिहास वाचा त्या इतिहासात तुम्हाला खऱ्या अर्थाने हिंदू धर्माची शिकवण काय असते हे समजेल. जाती जाती तेढ निर्माण करून मतदान मिळवता येत नाही. हा सुसंस्कृत महाराष्ट्र आहे इथे विचारांना महत्त्व आहे. नयना कडू बोलत असताना त्यांनी जाहीरपणे राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांना आव्हान केले. निवडणुकीची धामधूम संपली की माझ्या कुरडच्या घरी या आणि एकदा फार्म हाऊस बघूनच घ्या. तिथे रोज सकाळी 200 ते 300 दिव्यांग बांधव शेतकरी बांधव निराधार बांधव आपल्या समस्या घेऊन येतात आणि त्या समस्यांना सोडवण्याकरता बच्चू कडू नावाच रसायन हे नेहमी उपलब्ध असते. ते सुद्धा आपण आपल्या उघड्या डोळ्यांनी बघून घ्यावे. नयना ताई चे भाषण सुरू असताना सभेतील अनेक नागरिकांना अश्रू अनावर झाले. नयना कडूंच्या भाषणातील एक एक शब्द या मतदारसंघातील नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडणारा होता.

## हाडामासाचा कार्यकर्ताच इतिहास घडवितो-आ.बच्चू कडू

तब्बल पाच वाजता गर्दीतून मार्ग काढत बच्चू कडू गांधीपूल येथील सभास्थळी पोहचले. सभेला संबोधित करताना आ.कडू म्हणाले की, आजच्या विराट सभेने दाखवून दिले की बच्चू कडू ची खरी ताकद काय आहे. हाडामासाचा कार्यकर्ता जेव्हा उभा होतो तेव्हा इतिहास घडतो. बच्चू कडू ची खरी ताकद सामान्य जनता आहे. ही लढाई हिंदू–मुसलमानांची नसून ही लढाई हक्काची आहे. संपूर्ण महाराष्टात आपल्या उमेदवारांचा प्रचार करण्याकरता फिरत असताना अचलपूर मतदार संघातील माझ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांनी गाव खेड्यात जाऊन माझा प्रचार केला. महाराष्टात 'बटेंगे तो कटेंगे' हे चालणार नाही. आम्ही हिंदुस्तानला जोडायला निघालो. बच्चू कडू 23 तारखेला सरकार बनवायला निघणार आहे, असा ठाम विश्वास आमदार कडू यांनी आपल्या जाहीर सभेत बोलताना व्यक्त केला.

## प्रताप अडसड यांच्या बहिणीवर हल्ला

**अमरावती सवेरा ब्यूरो**

**अमरावती,( दि.18 )** - धामणगाव रेल्वे मतदार संघातील भाजपाचे उमेदवार प्रताप अडसड यांची मोठी बहिण अर्चना रोठे यांच्यावर 18 नोव्हेबर रोजी रात्री अज्ञात व्यक्तीने कोणत्यातरी शस्त्राने हल्ला केला. ही घटना सातेफळ फाट्याजवळ घडली. अर्चना रोठे या त्यांचे भाऊ उमेदवार प्रताप अडसड यांचा प्रचार करून घरी परत जात होत्या. दरम्यान सातेफळ फाट्यावर त्यांच्यावर अज्ञाताने हल्ला केला. या हल्ल्यात त्या जखमी झाल्या असून, त्यांनी रुग्णालयात उपचार घेतले. त्यांच्या हाताला जखम झाली असून, टाके पडले आहेत. या घटनेच्या माहितीवरून पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले होते. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## खल्लार गोंधळ प्रकरणी आणखी एक गुन्हा

**अमरावती-** खल्लार पोलिस ठाण्याच्या हद्दीत 16 नोव्हेबर रोजी घडलेल्या घटनेचे अनुषंगाने माजी लोकसभा सदस्य नवनीत राणा यांच्या तक्रारीवरून बी.एन.एस.एस. तसेच ॲट्रोसीटी ॲक्टनुसार 40 ते 50 इसमांविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आताच याच घटनेच्या अनुषंगाने अब्दुल हमीद अब्दुल मजीद (रा. खल्लार) यांच्या तक्रारीवरून बी.एन.एस.एस. चे कलमान्वये 12 इसमांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.16 नोव्हेंबर रोजी दर्यापुर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार रमेश बुंदीले यांचे प्रचारार्थ खल्लार येथे नवनीत राणा यांच्या सभेदरम्यान काही इसमांनी गोंधळ घालून त्यांच्या दिशेने खुर्चा भिरकावल्या होत्या. याबाबतच्या तक्रारीवरून खल्लार ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड करित आहे. त्याचप्रमाणे तक्रारदार अब्दुल हमीद अब्दुल मजीद यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था बाधीत करणे, तणाव निर्माण करणे, गोंधळ करणे तसेच खुर्चा फेकणे अशा आदी कृत्याकरिता 12 जणांविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# अचलपूरमध्ये भाजपकडून 'देशमुखां' चा गेम?

## दोघे मिळून 'बच्चुं' ना 'डच्चु' देण्याचे नियोजन फसले ?

*महासागर प्रतिनिधी*

*अचलपूर,( दि.18 ) - अचलपूर मतदारसंघाचा इतिहास आहे की, जेव्हा-जेव्हा येथे भारतीय जनता पक्षाचा किंवा युतीचा उमेदवार उभा राहीला, तेव्हा-तेव्हा काँग्रेसला पराभूत व्हावे लागले, यात भाजप किंवा युतीचा उमेदवार विजयी झाला असेही नाही, यात काँग्रेस-भाजप दोन्ही पक्षांचा पराभव होवून अपक्षाने बाजी मारली. त्यामूळे बच्चु कडूंसारख्या बलाढ्य उमेदवाराला पराभूत करण्यासाठी भाजप व काँग्रेस ने छुप्या पध्दतीने हातात हात घेत यंदा 'बच्चुं' ना 'डच्चु' देण्याची तयारी केली होती, अशी माहिति राजकीय गोटातून बाहेर येत आहे. असे असताना भाजप ने ऐनवेळी काँग्रेसच्या हातातून आपला हात सोडवून घेत आपण राजकारणात 'प्रविण' असल्याचे सांगून थेट लढत देणे सुरु केले. ऐन लढाई ची वेळी भाजपने आपला गेम केल्याचे लक्षात आल्याने देशमुखांनीही आर्थिक नुकसान टाळण्यासाठी 'पांढरा' निशाण दाखवित आपला घाम पुसणे सुरु केले असल्याचे दिसत आहे.*

सोमवारी (दि.18) विधानसभा निवडणूकीच्या प्रचारतोफा थंडावल्या. सर्व पक्षाच्या व अपक्षांच्या उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करित मोठमोठ्या बाईक रॅली काढल्या. त्या अगोदर आपल्या पक्षातील नेतेमंडळीच्या मोठमोठ्या प्रचार सभा घेतल्या. परंतू अचलपूर मतदारसंघात काँग्रेस ने ना प्रचार सभा घेतली, ना अखेरच्या दिवशी बाईक रॅली काढली. रॅलीची वाट पाहत रस्त्यावर नजर लावून बसलेला मतदार बबलू भाऊ गेले कोठे? असा प्रश्न विचारायला लागला आहे. उत्सुकतेपोटी या प्रश्नाच्या खोलात शिरल्यानंतर काही संशयांना वाव मिळाला तो असा, माजी मुख्यमंत्री, माजी काँग्रेस नेते अशोक चव्हाण भाजपात गेल्यानंतर बबलू देशमुखही भाजपमध्ये जातील अश्या वावड्या उठल्या होत्या, कारण अशोक चव्हाण यांना बबलु देशमुखांचे राजकीय मार्गदर्शक मानल्या जात होते. त्यानंतर जेष्ठ विचारवंत श्याम मानव यांनी अचानक बबलू



देशमुखांवर आरोप करित त्यांना भाजप चे 'स्लिपर सेल' संबोधले. काँग्रेसचे निष्ठावान, जिल्हाध्यक्ष देशमुखांवर असले आरोप लावणे कुणाच्याही पचनी पडण्यासारखे नव्हते, मात्र दुसऱ्या बाजुने आरोप लावणारा व्यक्तीसुध्दा 'चिल्लर' नव्हता. मगं नेमके घडतयं तरी काय? हे समजायला येत नव्हते. अशातच मातब्बर व्यक्ती रांगेत असताना भाजप ने अचलपूर मतदारसंघात प्रविण तायडे यांना उमेदवारी दिली. असदपूर सर्कल वगळता ज्यांची कुठलीच बांधणी अचलपूर मतदारसंघात नाही, अश्या व्यक्तीला उमेदवारी देवून भाजपच्या वरिष्ठ गोटात काय खेळी खेळल्या जात आहे, हे कळत नव्हते. स्थानिक भाजपकडून तायडे यांच्या उमेदवारी ला तीव्र विरोध होत असताना वरिष्ठांच्या चेहऱ्यावर प्रतिक्रीयेची एक रेषही उमटली नाही. सर्व काही योजनेप्रमाणे शिजत होते. मात्र प्रविण तायडे अपेक्षेपेक्षा जास्त कामाला लागले आणि काँग्रेसला ओव्हरटेक करुन प्रचारात पुढे निघाले. येथेच योजनेत 'मिठाचा खडा' पडला आणि घात झाला. तिवसा मतदारसंघात महाविकास आघाडी कडून काँग्रेसने उध्दव ठाकरे, मलिकार्जुन खरगे धामणगाव रेल्वे मतदारसंघात राहूल गांधी यांची सभा घेतली. मात्र अचलपूर मतदारसंघ काँग्रेसच्या किंवा महाविकास आघाडीच्या साध्या स्थानिक नेत्याचीही सभा घेण्यात आली नाही. मुस्लिम मत दुभागल्याने काँग्रेससाठी मशीदीतून फतवा काढण्याचे नियोजनही कोसळले. प्रहार कडे डीएमके(दलित, मुस्लिम, माळी, कुणबी), भाजपकडे लाडक्या बहिणी, वाटल्या गेल्याने बबलु देशमुखांनी शांत राहण्यातच आपली भलाई समजली असावी. त्यामूळे देशमुखांनी आपली प्रचाराची तोफ आधीच थंड करुन ठेवली. बच्चु कडूंच्या विरोधात मतांचं भाजप-काँग्रेसमध्ये विभाजन टाळण्याकरिता हा पवित्रा तर घेतला नाही ना, अशीही चर्चा नागरिक करित आहेत, असे असतानाही अचलपूर मतदारसंघात नेमकं कोण बाजी मारणार हे चित्र 23 नोव्हेंबर रोजीच स्पष्ट होईल.

### युतीमुळे काँग्रेसचे वारंवार नुकसान

अचलपूर मतदारसंघात पुर्वीपासून भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवारामूळे काँग्रेसच्या उमेदवाराचे वारंवार नुकसान झाले आहे. सन 2004 मध्ये अपक्ष उमेदवार बच्चु कडू अचलपूर मतदारसंघात पहिल्यांदा विजयी झाले. त्यांनी काँग्रेसच्या वसुधा देशमुख यांचा पराभव केला होता. यावेळी भाजपकडून विनायकराव कोरडे उभे होते. सन 2004 मध्ये बच्चु कडूंना 56 हजार 471, वसुधा देशमुखला 51 हजार 085 तर विनायकराव कोरडे यांना 31 हजार 475 मते मिळाली होती. सन 2009 मध्ये बच्चु कडूंनी पुन्हा काँग्रेसच्या वसुधा देशमुख यांचा पराभव केला. यावेळी युतीचे उमेदवार म्हणून माजी खासदार अनंत गुढे उभे होते. यावेळी बच्चु कडू यांना 60 हजार 627 मते, वसुधा देशमुख यांना 54 हजार 884 मते, तर अनंत गुढे यांना 24 हजार 824 मते मिळाली होती. सन 2014 मध्ये पुन्हा तेच घडले प्रहार चे बच्चु कडू यांच्या विरुध्द काँग्रेसकडून बबलू देशमुख पहिल्यांदा रिंगणात आले. यावेळी भाजपने अशोक बन्सोड यांना उमेदवारी दिली. प्रहार व भाजपमध्ये लढत होवून पुन्हा बच्चु कडू विजयी झाले. यात काँग्रेस तिसऱ्या नंबरवर राहीली. यावेळी बच्चु कडूंना 59 हजार 234 मतं, अशोक बन्सोड यांना 49 हजार 064 मतं आणि बबलु देशमुख यांना 26 हजार 490 मतं मिळाली होती. सन 2019 पुन्हा काँग्रेसने बच्चु कडूंविरोधात दंड थोपटले. काँग्रेसकडून बबलु देशमुख यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली. तर शिवसेना-भाजप युतीकडून सुनिता फिस्के यांना उमेदवारी देण्यात आली. बच्चु कडू आणि बबलु देशमुख यांच्यात काट्याची लढत झाली, बच्चु कडू यांनी देशमुखांना पुन्हा पाणी पाजले आणि विजय मिळविला. यावेळी बच्चु कडूंना 81 हजार 252, बबलु देशमुखांना 72 हजार 856 तर सुनिता फिस्के यांना 15 हजार 064 इतकी मतं मिळाली होती.



## शेवटच्या दिवशीही यशोमती ठाकूर यांचा प्रचाराचा झंझावात

### विविध संस्था, संघटना व अपक्ष उमेदवारांच्या पाठिंब्याने यशोमतींचा विजय निश्चित

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटच्या दिवशी तिवसा मतदार संघातील शेवटच्या गावापर्यंत पदयात्रा काढून यशोमती ठाकूर यांनी नागरिकांची संवाद साधला. या दौऱ्यात त्यांना विविध संस्था आणि संघटनांना सोबतच काही उमेदवारांचा देखील बिनशर्त पाठिंबा मिळाल्यामुळे यशोमती ठाकूर यांचा विजय निश्चित झाला आहे.

महाविकास आघाडीच्या उमेदवार माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी तिवसा मतदारसंघात प्रचाराचा झंझावात शेवटच्या दिवस पर्यंत कायम ठेवला. सुरुवातीपासूनच त्यांनी प्रचारात आघाडी घेत विरोधकांना निवडणूक सोपी नसल्याचे दाखवून दिले. सर्वच गावातील नागरिकांनी आ.ठाकूर यांना उस्फुर्त प्रतिसाद देत मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आश्वासन दिले. तिवसा मतदार संघातील सर्वच गावात यशोमती ठाकूर यांनी विविध योजना राबवून विकासाची गंगा पोहोचविली. पाणीपुरवठा योजना, घरकुल योजना आणि आरोग्याच्या सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देत यशोमती ठाकूर यांनी मतदार संघाचा विकास केला. रस्ते, शिक्षण, आरोग्य तसेच इतरही महत्त्वाचे विकास कामे मतदार संघात करून यशोमती ठाकूर यांनी नागरिकांमध्ये एक आदराचे स्थान निर्माण केले. आपला नेता कसा असावा, तर तो सर्व गुण संपन्न असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे यशोमती ठाकूर आहे. असे मत नागरिकांनी प्रचार दौऱ्यात व्यक्त केले. आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मार्डी, दिवानखेड, घोटा, चिखली, वीरगव्हाण येथे पदयात्रा काढून यशोमती ठाकूर यांनी नागरिकांशी संवाद साधला. संपूर्ण तालुक्यात व तिवसा मतदारसंघात यशोमती ठाकूर यांना निवडून येण्यासाठी अनुकूल वातावरण असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले आहे. प्रत्येक गावात यशोमती ठाकूर यांचे जंगी स्वागत करण्यात येत असून नागरिकांचा त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

### विविध संस्था व संघटनांचा पाठिंबा

तिवसा विधानसभा मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवीत असलेल्या महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांना विविध संस्था व संघटनांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळणाऱ्या त्या जिल्ह्यातील एकमेव उमेदवार ठरल्या आहे. आजपर्यंत त्यांना अपक्ष उमेदवारासोबतच सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रातील अनेक घटकांनी पाठिंबा दिल्यामुळे त्यांचा विजय अधिक सुनिश्चित झालाय. वाढत्या पाठिंबामुळे यशोमती ठाकूर ह्या चौथ्यांदा सहज विजयी होतील असेच चित्र मतदार संघात आहे. अखिल भारतीय बारी समाज राजकीय विचार मंच, अपंग जनता दल, अण्णाभाऊ साठे समता परिषद सामाजिक संघटना, विदर्भ प्रदेश मातंग समाज संघ यांनी शेवटच्या दिवशी पाठिंबा देऊन यशोमती ठाकूर यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा संकल्प केला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४



# 'ऑटो'च्या ऐतिहासिक रॅलीने विरोधक गारद

## सर्व समावेशक पाठिंब्यामुळे विजयाची निश्चिती

## प्रचार महारॅली प्रिती संजय बंड यांनी भरला विजया हुंकार

*महासागर प्रतिनिधी*

***अमरावती,(दि.18)-बडनेरा विधानसभा निवडणुकीमध्ये अपक्ष म्हणून निवडणूक लढवीत असलेल्या लोकनेते स्व.संजय बंड यांच्या पत्नी प्रिती संजय बंड यांच्या प्रचारार्थ आज शेवटच्या दिवशी काढण्यात आलेली मोटरसायकल व ऑटोरिक्षा रॅली ऐतिहासिक ठरली. रेकॉर्ड ब्रेक गर्दीमुळे विरोधकांचे धाबे दणाणले असून सर्वपक्षीय पाठिंबा प्रिती संजय बंड यांच्या विजयाकरिता महत्त्वाचा ठरणार आहे.***

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून असलेला बडनेरा विधानसभा मतदारसंघ प्रिती बंड यांच्या उमेदवारीने चांगलाच चर्चेत आला. सुरुवातीपासूनच प्रचारात मोठी आघाडी घेतलेल्या प्रिती बंड यांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रत्येक प्रचार यात्रेत महिला व पुरुषांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती, जनता जनार्दनाचे मिळत असलेले समर्थन बघता प्रिती बंड यांचा विजय निश्चित आहे. असे चित्र स्पष्ट झाले आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी संजय बंड चौक मैदान येथून स्वयंम स्फूर्तीने अमरावती शहरातील ऑटो चालकांनी आपले ऑटो प्रचाराच्या यात्रेत सहभागी करून घेतले. यासोबतच प्रिती बंड यांचा चाहता वर्ग, तरुण मंडळी यांनी देखील मोटरसायकल रॅलीत सहभाग घेतला. रॅलीत स्वत:हून नागरिक सहभागी झाल्याने या रॅलीचे रूपांतर महारॅलीत झाले. ही रॅली बघण्यासाठी शहरवासीयांनी स्वयस्फुर्तीने प्रचंड गर्दी केली होती. प्रचार रॅली प्रामुख्याने विकास कॉलनी, छाबडा प्लॉट, प्रशांत नगर, वडरपुरा, यशोदा नगर, मोती नगर, कवर नगर, फरशी स्टॉप, दस्तूर नगर, गणपती नगर, हॉटेल लॉर्ड्स, गोपाल नगर मार्गे नवाथे प्लॉट, समर्थ हायस्कूल, रवी नगर, साईनगर, अकोली, बेनाम चौक, जुनी वस्ती, बडनेरा शहर या भागातून काढण्यात आली. त्यानंतर मुख्य प्रचार कार्यालय सातुर्णा या ठिकाणी रॅलीचा समारोप झाला.



### लक्षवेधक ठरली रॅली

प्रचाराच्या शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांनी भाडोत्रींना घेऊन प्रचार केला. मात्र अपक्ष उमेदवार प्रिती संजय बंड यांच्या प्रचार रॅलीत शहरातील ऑटो रिक्षा चालकांनी सहभाग घेतला हा सहभाग इतका मोठा होता की नागरिकांनाही या रॅलीचे नवल वाटले. लक्षवेधक ठरलेली ही रॅली बघण्यासाठी लोकांनी एकच गर्दी केली. हजारो ऑटो चालकांनी रॅलीत सहभाग घेऊन प्रिती बंड यांना समर्थन दिले. आजपर्यंत अशी भव्य ऑटो रिक्षा रॅली बघितली नाही असे नागरिकांनी मत व्यक्त करत असतानाच प्रिती बंड यांचा विजय निश्चित असल्याचे सुतोवाच केले.

# मतदारसंघाच्या चौफेर विकासासाठी पुन्हा संधी द्या - देवेंद्र भुयार



## रेकॉर्ड ब्रेक गर्दीच्या प्रचार सभेने काढले विक्रम मोडीत

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.18 )-** वरुड-मोर्शी विधानसभेचा प्रचार अंतिम टप्प्यात आयोजित सभेमध्ये आमदार देवेंद्र भुयारांच्या रेकॉर्ड ब्रेक गर्दीचा प्रत्यय मराठी शाळेच्या मैदानावर विरोधकांना दिसून आला, त्यांच्या रॅलीमध्येही 'न भूतो' अशी गर्दी दिसून आली त्यामुळे देवेंद्र भुयारांच्या विजयाचा मार्ग सुकर झाल्याची चर्चा सभास्थळी उपस्थित मतदारांमध्ये सुरू होती.

या सभेमध्ये जवळपास 25 ते 30 हजार मतदारांची उपस्थिती असल्याची माहिती आहे. आज पर्यंतच्या काळात कुठल्याही नेत्याच्या सभेमध्ये एवढी उपस्थिती नव्हती किंबहुना त्याहीपेक्षा जास्त रेकॉर्ड ब्रेक गर्दीची सभा देवेंद्र भुयारांची आज प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात झाली त्यामुळे या सभेची सर्वत्र चर्चा असून विरोधकांचे मात्र या रेकॉर्ड ब्रेक गर्दीने धाबे दणाणले आहे.

मी जातीपातीच्या नावावर तुम्हाला मते मागणार नाही, मी खोटे बोलून तुम्हाला मते मागणार नाही, तर मी फक्त आणि फक्त विकासावर मते मागणार आहे असे भुयार यांनी यावेळी मतदारांना सांगितले. मी या पाच वर्षाच्या काळात वरुड-मोर्शीच्या विकासासाठी 4372 कोटी रुपये आणले, यावरच न थांबता मला पुन्हा मतदारांनी निवडून दिले तर या मतदार संघाच्या चौफेर विकासासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे स्पष्ट संकेत यावेळी बोलताना आमदार भुयारांनी दिले.

विधानसभेमध्ये चर्चा सुरू असताना लाडक्या बहिणीसाठी महिन्याला पंधराशे रुपयाची तरतूद करण्याची विनंती मी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना केली होती. त्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन ताबडतोब लाडक्या बहिणीसाठी पंधराशे रुपयांची तरतूद करून त्यांना आतापर्यंत साडेसात हजार रुपये दिले आहे. याचे श्रेय केवळ आणि केवळ अजितदादा पवाराबरोबरच देवेंद्र भुयार म्हणून माझे आहे, हे अभिमानाने आपल्यासमोर सांगतो याचा मला पूर्ण आत्मविश्वास आहे. एवढेच नाही तर महायुतीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणीसाठी 2100 रुपये महिन्याला देणार असल्याचे आश्वासन सुद्धा यावेळी मी आपणाला देतो, असेही ते म्हणाले. या वाक्यावर महिलांनी टाळ्या वाजवून आमदार देवेंद्र भुयारांच्या आश्वासनाला प्रतिसाद दिला. भूयार पुढे म्हणाले, मी एवढ्यावरच न थांबता मतदार संघाच्या विकासासाठी पुन्हा मला एक वेळ संधी दिल्यास मी माझ्या वयाच्या 35 व्या वर्षी मतदार संघातील तरुणाच्या हाताला काम म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार, शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना हात घालून त्यांना न्याय मिळवून देईल.

या सभेला मराठी सिने अभिनेत्री अलका कुबल, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष महात्मे, राज्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य बाळू पाटील यांच्यासह असंख्य गणमान्य व्यक्ती व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाला वरुड-मोर्शी विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावातून हजारो मतदारांची उपस्थिती होती.

# डॉ. विश्वकर्मांना मत देऊन विरोधकांचा बदला घ्या - अभिनेता फिरोजखान

## तळेगाव दशासर, घुईखेड येथील जाहीर सभेत केले आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.18 ) -** भाजपने धर्माधर्मात तुकडे पाडण्याचे काम केले आहे. जेव्हा-जेव्हा धरतीवर पाप वाढते, तेव्हा-तेव्हा नाश होतो. जो चांगले काम करेल, त्याला फळ मिळेल. कोविड मध्ये ज्याने मदत केली त्यालाच मत देऊन यावेळी विरोधकाचा बदला घ्या, असे आवाहन तळेगाव दशासर, घुईखेड येथे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांच्या आयोजित प्रचार सभेत महाभारतात अर्जुनाची भूमिका बजाविणारे अभिनेता फिरोज खान पठाण यांनी केले.



फिरोज खान पुढे म्हणाले की, मी मत मागायला आलो नाही, मात्र खरी कहाणी सांगायला आलो आहे. भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी देशाला लुटण्याचे काम केले आहे. मुस्लीम आणि दलितांची मते घेऊन त्यांच्यावर अन्याय करण्याची भूमिका या पक्षांनी केली आहे. येत्या 20 तारखेला मतदान केले नाही तर 5 वर्ष पश्चातापाची वेळ येईल, 'अल्ला ने हम सब एक है' असे सांगितले आहे. परंतु भाजपने हिंदू-मुस्लीम करून देशाचे तुकडे पाडले आहे. कोविड सारख्या महामारीत डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी मदत केली. कुराण मध्ये हिंदू, मुस्लीम लिहिले नाही, मग भाजपवाल्यांना हा अधिकार कोणी दिला. त्यामुळे या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार म्हणून डॉ.निलेश विश्वकर्मा यांना मत देऊन विरोधकांचा बदला घ्या, असे आवाहन सिने अभिनेता फिरोज खान पठाण यांनी जाहीर सभेत केले.

### मोदी घोटाळेबाज पवारांच्या मांडीला मांडी लावून बसतात

डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी आपल्या भाषेत विरोधकांचा चांगला समाचार घेतला. विश्वकर्मा म्हणाले ही निवडणूक फार वेगळी असून विचार धारेवर व्हायची होती, परंतु तसे होत नाही. पक्षांचे धोरण दोन्ही विरोधकांनी माती मोल केले आहे. घोटाळे बाजाला अजित पवारांना मोदींच्या मांडीला माडी लावून बसविले जाते. जनतेने यांच्यावर काय विश्वास ठेवावा. मतदार संघात आरोग्याची, शिक्षणाची सोय नाही. शेतकरी व महिलांना भर सभेत काँग्रेस उमेदवार अर्वाच्य भाषेत बोलतात. काँग्रेस ही मत विकणारी पार्टी आहे. विधान परिषद निवडणुकीत भाजपला मते दिली, त्यामुळे त्यांना या निवडणुकीत मतदारांनी हिस्का दाखवावा तेव्हाच ते सुधरेल. शेतकरी व तरुणांच्या समस्यांची काही देणे, घेणे नाही. हे फक्त कमिशनखोर झाले आहे. त्यामुळे या निवडणुकीत मला निवडून द्या, मी यांचा हिशोब घेतो असा खणखणीत इशारा डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी जाहीर सभेत दिला आहे.

# विवाहितेच्या आत्महत्याप्रकरणात पतीसह चौघांवर गुन्हे

**अमरावती** - विवाहितेच्या आत्महत्याप्रकरणात चिखलदरा पोलिसांनी 16 नोव्हेबर रोजी पतीसह सासु-सासरे नंनदीवर गुन्हा नोंदविला. पती कुलदिप जगदेव इंगळे (28), सासरचे जगदेव सगण्या इंगळे (53) व तीन महिलांचा आरोपींमध्ये समावेश आहे. नथ्थु झुगर्या घुमारे (52, रा. सेमाडोह, चिखलदरा) यांनी चिखलदरा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले की, त्यांची मुलगी अंकिता कुलदिप इंगळे(25, रा. काटकुंभ) हिला तिच्या पतीसह सासु-सासरे व दोन नंनदा यांनी घरगुती कारणावरून तसेच तिच्या दिसण्यावरून शारिरिक व मानसिक छळ केला. तसेच लग्नातील खाऊच्या पैशांवरून छळ करून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. अशा तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी पतीसह सासु-सासरे व नंनदा यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला.




